# मुलींनी भविष्याची आव्हाने समजून घ्यावीत : आनंद यादव

कोल्हापूर, दि. ८ (प्रतिनिधी) : भवितव्यातील वास्तवतेचे भान मुलींनी समजून घेऊन आपले प्रश्न काय आहेत, याचा विचार केला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक डॉ. आनंद यादव यांनी व्यक्त केले. कमला कॉलेजच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थीनींना पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आले.

डॉ. यादव म्हणाले, मुलींनी आपले भवताल कसे आहे. याचा विचार करून पुढे काय करायचे हे ठरविले पाहिजे. स्त्रीयांच्या समोरील आव्हाने वेगळी आहेत. नव्या पिढीच्या मुला-मुलींच्या अपेक्षा वेगळ्या आहेत. यापुढे दोघांनीही नोकरी केली तरच भवितव्य आहे. समाजात पाय रोवून उभे राहण्यासाठी व्यावसायिक शिक्षण अथवा बुद्धिच्या कल्पतेनुसार उद्योग करावा लागणार आहे.

ते म्हणाले, आजची स्त्री बदलत चालली आहे. मुलींना त्यांच्या मार्गातील नव्या वाटा दिसू लागल्या आहेत. त्यामुळे आत्मविश्वास प्राप्त झालेली ही मुलींची पिढी दिसत आहे. रणरागिनी स्त्रीया कोल्हापुरातच झाल्या आहेत. त्या धाडसी व जीवनात अग्रेसर आहेत. मुली उच्च विद्याविभूषित झाल्या तरच पुरुषांच्या पुढे जावून वेगळे पराक्रम निर्माण करण्याची क्षमता सिद्ध करतील. त्यासाठी अभ्यासाबरोबरच इतर वाचन व त्याला चिंतनाची जोड असणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.




कमला कॉलेजमध्ये आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमाप्रसंगी बोलताना ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक डॉ. आनंद यादव. शेजारी प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, माजी खासदार उदयसिंह गायकवाड, माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर, प्रा. रेखा पंडित.

माजी खासदार उदयसिंह गायकवाड, प्रा. डॉ. चंद्रकांत पाटगावंकर, विश्वासराव बागल, उपप्राचार्य एस. एन. कोळेकर, डॉ. श्रीमती एस. एम. काळे, श्रीमती एस. एस. पाटील आदी मान्यवर व शिक्षक उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत कु. अनुजा भोसले हिने केले. गौरवगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. वार्षिक अहवाल वाचन प्रा. रेखा पंडित यांनी केले. पारितोषिक वितरण यादीचे वाचन प्रा. डॉ. सौ. व्ही. व्ही. मैंदर्गी यांनी केले. प्रा. सौ. तेजस्विनी मुडेकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सौ. एस. एन. धुमाळ यांनी आभार मानले.